# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १८ नोव्हेंबर २०२५


## युनिक हेअरस्टाइलवरून चोराचा पर्दाफाश ; जामिनासाठी पैसे जमवणारेही जाळ्यात



**छत्रपती संभाजीनगर :** पुंडलिकनगर पोलिसांनी तपासकामात उत्कृष्ट कौशल्य दाखवत दोन वेगवेगळ्या गुन्ह्यांतील चार आरोपींचा छडा लावला. वेगळी हेअरस्टाइल आणि भावाच्या जामिनासाठी पैसे जमा करण्याचा गुन्हेगारांचा डाव या दोन महत्त्वाच्या धाग्यांवरून पोलिसांनी ही कारवाई केली. पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून एकूण १ लाख ९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

गारखेडा येथील मोहटादेवी मंदिराजवळ १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी सुमन निकम यांच्या गळ्यातील आणि कानातील सोन्याचे दागिने दुचाकीवरून आलेल्या तिघांनी हिसकावून नेले होते. तपासादरम्यान पोलिसांनी परिसरातील १८ सीसीटीव्ही फुटेज तपासले. या फुटेजमध्ये एका युवकाची वेगळी हेअरस्टाइल पोलिसांच्या नजरेत भरली. ती हेअरस्टाइल शुभम राठोड याची असल्याचे ओळखताच पोलिसांनी त्याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. शुभमने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर पोलिसांनी प्रमुख आरोपी कृष्णा सोळंके, शुभम राठोड आणि मयूर दोटीयाल यांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून सोन्याचे १२ मणी, कानातील कुड्या आणि मोबाइल जप्त करण्यात आला.

दुसऱ्या एका प्रकरणात पोलिसांनी रामदास वाघ यांच्या घरफोडीतील आरोपी अमन मेहबूब शेख यालाही पकडले. या गुन्ह्यात कृष्णा सोळंके आणि शुभम राठोडचा सहभाग होता. चौकशीत मुख्य आरोपी कृष्णा सोळंके हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याचा भाऊ गजानन याच्यावर एम. सिडको ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल आहे. गजाननच्या जामिनासाठी पैसे जमवण्यासाठी या टोळीने विविध ठिकाणी चोरी आणि हिसकावण्याचे गुन्हे केल्याचे पोलिसांनी सांगितले.

होमगार्डच्या पत्नीच्या पोटात लाथ मारून मंगळसूत्र हिसकावणाऱ्या दोघा भावंडांकडून पुंडलिकनगर पोलिसांनी चोरीचे ११ मोबाइल आणि एक मोपेड असा २ लाख ९८ हजारांचा ऐवज हस्तगत केला. कृष्णा ऊर्फ कुल्ला माणिकराव सोळंके आणि त्याचा भाऊ गजानन माणिकराव सोळंके यांना अटक केली होती. हनुमाननगरच्या घरी पाणी भरत असताना आरोपी कृष्णा घराबाहेर येऊन पिल्लू पिल्लू असा आवाज देत होता. कोण आहे हे बघण्यासाठी आल्या असता आरोपी कृष्णाने वैशाली यांच्या पोटात लाथ मारून त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून त्याचा भाऊ आरोपी गजाननसोबत तो दुचाकीने पसार झाला होता.

## अभ्यासकेंद्रांनी काळानुरूप बदलले पाहिजे - प्रा. डॉ. प्रकाश देशमुख




**नाशिक :** अभ्यासकेंद्र हा मुक्त विद्यापीठाचा कणा आहे, अभ्यासकेंद्रांनीच ज्ञानगंगा घरोघरी पोहोचविण्याचे काम केले आहे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या काळात अभ्यासकेंद्रानाही काळानुरूप बदल करावे लागतील असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक प्रा.डॉ. प्रकाश देशमुख यांनी केले.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या वतीने छत्रपती संभाजी नगर विभागीय केंद्रांतर्गत अभ्यासकेंद्रांसाठी दोन दिवशीय उद्बोधन कृती सत्राचे आयोजन नाशिक मुख्यालयात केले आहे याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. प्रकाश देशमुख बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर विभागीय केंद्राचे संचालक डॉ. नंदकुमार राठी हे होते. याप्रसंगी नोंदणी विभागाचे उपकुलसचिव मनोज घंटे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.प्रकाश देशमुख यांनी भारतातील मुक्त विद्यापिठे आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांचा इतिहास आणि तुलनात्मक आढावा सादर करून यापुढे मुक्त विद्यापीठाची गरज आणि वाटचाल कशी असेल याचे विवेचन केले.याप्रसंगी झालेल्या विविध सत्रांमध्ये मानव विद्या व सामाजिकशास्त्र विद्याशाखेचे संचालक नागार्जुन वाडेकर, वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखेचे संचालक सुरेंद्र पाटोळे, शिक्षणशास्त्र विद्याशाखेचे संचालक डॉ. संजीवनी महाले, संगणकशास्त्र विद्याशाखे संचालक डॉ. चेतना कमळस्कर, कृषी विद्याशाखेचे संचालक डॉ.माधुरी सोनवणे, आरोग्य विज्ञान विद्याशाखेच्या संचालक डॉ. रश्मी रानडे , स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंगचे संचालक गणेश लोखंडे, यांनी उपस्थित सर्व अभ्यासकेंद्र प्रतिनिधींना आपापल्या विद्या शाखेची माहिती दिली. डॉ. संतोष साबळे यांनी माजी विद्यार्थी संघटनेच्या कार्याची माहिती देऊन पुढील उपक्रमांची रूपरेषा सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पूनम वाघ यांनी केले तर डॉ. दयानंद हत्तीहंबीरे यांनी आभार मानले.

## निवडणुकीच्या तोंडावर रस्ता रुंदीकरणाच्या हालचाली : मुख्यमंत्र्यांसमोर कौतुक होताच महापालिका लागली कामाला

**छत्रपती संभाजीनगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर रविवारी (१६ नोव्हेंबर) पालकमंत्री संजय शिरसाट यांनी रस्ता रुंदीकरण कारवाईचे कौतुक केले. रस्त्यांच्या विकासासाठी ३५०० कोटींची मागणीदेखील केली. हे होते ना होते तोच सोमवारी (१७ नोव्हेंबर) मनपा मुख्यालयात अतिक्रमण विभागाची बैठक पार पडली आणि दोन दिवसांत रस्ता रुंदीकरणाची मोहीम पुन्हा सुरू होणार असल्याचे संकेत मनपाकडून देण्यात आले.

मात्र संपूर्ण नियमांची अंमलबजावणी करून कारवाई करा, असे आदेश मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले. या बैठकीत दहा रस्त्यांवरील अतिक्रमण हटवण्याच्या पुढील टप्प्याला त्वरित सुरुवात करण्याचे आदेश देण्यात आले. मनपा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतरदेखील पुन्हा कारवाई सुरू होते आहे, याबाबत आश्चर्य व्यक्त होते आहे.

या बैठकीत दहा महत्त्वाच्या रस्त्यांवरील अतिक्रमण हटवण्याच्या पुढील टप्प्याला त्वरित सुरुवात करण्याचे आदेश देण्यात आले. मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांनी स्पष्ट केले की, कुंभमेळ्याबरोबरच शहरातील भविष्यातील पायाभूत सुविधांची गरज लक्षात घेऊन रस्ता रुंदीकरण मोहीम सुरू करण्यात आली आहे आणि ही कारवाई सुरूच राहणार आहे, मात्र सर्व नियमांची अंमलबजावणी करूनच कारवाई करण्यात येईल.

निवडणुकीची घोषणा होताच मनपाकडून ही कारवाई गुंडाळली गेली अशी चर्चा होती. मात्र मनपाने पुन्हा ही कारवाई सुरू होणार असे जाहीर करताच अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. याचे राजकीय पडसाद उमटतील अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. विशेष म्हणजे सहा रस्त्यांचे रुंदीकरण करण्यासाठी ५००० मालमत्तांवर कारवाई करण्यात आली. आतापर्यंत उपमुख्यमंत्र्यांकडे दोनदा आणि मुख्यमंत्र्यांसमोर एकदा याबाबत प्रेझेंटेशन झाले. २००० कोटींची मागणीदेखील करण्यात आली. मात्र अजून कुठलीही ठोस घोषणा नाही.

कुंभमेळ्याबरोबरच शहरातील भविष्यातील पायाभूत सुविधांची गरज लक्षात घेऊन शहरात रस्ता रुंदीकरण मोहीम सुरू करण्यात आली आहे. ही कारवाई सुरूच राहणार. मात्र सर्व नियमांची अंमलबजावणी करून कारवाई करण्यात येईल. -जी. श्रीकांत, मनपा आयुक्त.

बुधवार, गुरुवार, शुक्रवार या तीन दिवसांत तीन प्रमुख रस्त्यांवर रुंदीकरणाची कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती अतिक्रमण हटाव विभागाचे सं◌ंनियंत्रण अधिकारी संतोष वाहुळे यांनी दिली. या तीन रस्त्यांत पडेगाव मुख्य रस्ता ते एमजीएम गोल्फ कोर्ट , हर्सूल टी पॉइंट ते समृद्धी लॉन्स , क्रांती चौक ते पैठण गेट या रस्त्यांचा समावेश आहे, असे त्यांनी सांगितले. निवासी मालमत्ता काढून घेण्यासाठी १५ ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली होती. ही मुदत संपल्यानंतरही अनेक मालमत्ताधारकांनी बाधित निवासी मालमत्ता काढून घेतलेल्या नाहीत, अशा मालमत्तांवरही आता कारवाई केली जाणार आहे.

शहरातील सर्वाधिक वाहतूक असलेला जालना रोड या वेळीही दुर्लक्षित राहिला आहे. या कारवाईची सुरुवातच मुकुंदवाडी ते चिकलठाणा रस्ता रुंदीकरणपासून सुरू झाली होती. मात्र सेव्हन हिल्स ते मुकुंदवाडी या रस्त्याचे रुंदीकरण बाकी आहे. मनपा, एमआयडीसी आणि सिडको या तीन विभागांची बैठक घेऊन रस्ता रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात येणार होते. तीन महिने होऊन गेले तरी ही कारवाई सुरू झालेली नाही.

पडेगाव ते मिटमिटा ते गोल्फ कोर्स ३० मीटर नगर नाका ते महापालिका हद्द ६० मीटर कांचनवाडी ते लॉ विद्यापीठ ३६ मीटर रेणुकामाता कमान ते उमरीकर लॉन्स, सातारा १८ मीटर हर्सूल टी पॉइंट ते मनपा हद्द ६० मीटर सेव्हन हिल्स चौक ते भाजीवाली बाई पुतळा २४ मीटर महावीर चौक ते जळगाव टी पॉइंट ३५ मीटर चंपा चौक ते जालना रोड (तीन टप्पे) ३० मीटर क्रांती चौक ते पैठण गेट ३० मीटर हर्सूल कारागृह ते अंबर हिल जटवाडा रोड २४ मीटर (याशिवाय नक्षत्रवाडी व शहरातील काही प्रमुख अंतर्गत रस्त्यांवरदेखील मार्किंग आणि टोटल स्टेशन सर्व्हे करणे सुरू आहे.)

रस्ता रुंदीकरण मोहीम सुरू करण्यापूर्वी रस्त्यांचे सर्वेक्षण, टोटल स्टेशन सर्वेक्षण त्यानंतर मार्किंग, नोटीस दिल्यानंतर ज्या भागात कारवाई करायची आहे त्या भागात अनाउन्समेंटनंतरच कारवाई करण्यात येणार आहे. नोटीस प्रक्रिया नियमानुसार पूर्ण करून कारवाई तातडीने सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हर्सूल परिसरात ध्वनिक्षेपकाद्वारे नागरिकांना आगाऊ सूचना देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.